# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : विधानसभा अध्यक्ष यांचा ठराव :-**

"कविवर्य श्री. वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व साहित्यिक क्षेत्रामध्ये दिलेले मोलाचे योगदान, मराठी ही ज्ञानभाषा होण्यासाठी घेतलेले अथक परिश्रम, त्यांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून शासनाने साजरा करण्याचा घेतलेला स्तुत्य निर्णय, महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा देण्यात येऊन त्यानंतरच्या काळात मराठी भाषा आणि मराठी संस्कृतीच्या विकासाला चालना देण्यासाठी भाषा संचालनालय, विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ आणि राज्य मराठी विकास संस्था या संस्थांची राज्य शासनाकडून निर्मिती करण्यात येणे, मराठी भाषेचे धोरण ठरविण्याकरिता भाषा सल्लागार समिती नेमणे, त्याचप्रमाणे मराठी मधील विविध मान्यवर साहित्यिकांनी तसेच नाट्य व चित्रपट क्षेत्रातील विविध मान्यवरांनी मराठी भाषा समृध्द करण्यासाठी आपापल्या स्तरावर प्रयत्न करुन मराठी भाषेच्या संवर्धनासाठी अविरतपणे योगदान देणाऱ्या सर्व साहित्यिकांचे मी मन:पुर्वक अभिनंदन करतो.

अत: मराठी भाषा ही जास्तीत जास्त लोकाभिमुख होऊन ती ज्ञानभाषा व्हावी याकरिता शासनाने मराठी भाषेच्या विकास प्रक्रियेस अधिक चालना द्यावी अशी शिफारस मराठी भाषा गौरव दिनानिमित्त ही विधानसभा शासनास करीत आहे."

**दोन : प्रश्नोत्तरे.**

**तीन : अध्यक्ष, सभाध्यक्षांची तालिका नामनिर्देशित करतील.**

**चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **सर्वश्री. अतुल भातखळकर, सरदार तारासिंह, शरद सोनावणे, राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, मो. आरिफ नसीम खान, अमित देशमुख, अमीन पटेल, त्र्यंबक भिसे, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. सुनिल केदार, अमर काळे, अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. अब्दुल सत्तार, संग्राम थोपटे, राहुल बोंद्रे, भारत भालके, अशोक पाटील, पृथ्वीराज चव्हाण, श्रीमती निर्मला**

**गावित, ॲड. यशोमती ठाकूर, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री. कुणाल पाटील, डी.पी. सावंत, डॉ. राहुल पाटील, ॲड. पराग अळवणी, कॅप्टन आर.तमिल सेल्वन, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. नरेंद्र पवार, नरेंद्र महेता, अबु आझमी, वैभव नाईक, सुरेश धानोरकर, मंगेश कुडाळकर, कालीदास कोळंबकर, श्रीमती अमिता चव्हाण, श्री. जयकुमार गोरे, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री. शेख आसिफ शेख रशीद, बाळासाहेब थोरात, अमित झनक, भाऊसाहेब कांबळे, सुनिल शिंदे, संतोष दानवे, ॲड. भीमराव धोंडे, सर्वश्री संजय केळकर, किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, श्रीमती तृप्ती सावंत, सर्वश्री नितेश राणे, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, भास्कर जाधव, जयदत्त क्षीरसागर, प्रदीप जाधव-नाईक, संदीप नाईक, राणाजगजीतसिंह पाटील, राहुल जगताप, पांडुरंग बरोरा, दत्तात्रय भरणे, वैभव पिचड, हनुमंत डोळस, हसन मुश्रीफ, विजय भांबळे, मकरंद जाधव-पाटील, सर्वश्रीमती सुमन पाटील, दिपिका चव्हाण, डॉ. सतीश पाटील, श्री पंकज भुजबळ, श्रीमती ज्योती कलानी, सर्वश्री सुरेश लाड, राहुल मोटे, दिपक चव्हाण, बाळासाहेब पाटील, संजय कदम, श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, ॲड. राहुल कुल, श्री. सुरेश गोरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील लोअर परेल भागातील कमला मील मधील 'वन अबव्ह' 'मोझोज ब्रीस्टो' या रेस्टोपबला दिनांक २८ डिसेंबर, २०१७ रोजी लागलेल्या आगीत १४ जणांचा मृत्यु होऊन ५० हून अधिक व्यक्ती गंभीर जखमी होणे, रेस्टोपबच्या मालकांनी रेस्टोपबमधील स्वयंपाकगृह, आसनव्यवस्था, स्वच्छतागृह व प्रवेशद्वारामध्ये अग्निशमन दल व महापालिकेच्या संबंधित विभागाची कोणतीही परवानगी न घेता केलेले अनधिकृत बांधकाम, कमला मिलमधील विकास कामांना परवानगी देतांना एक तृतीयांश जागा महापालिकेला व एक तृतीयांश जागा म्हाडाला देणे बंधनकारक असतांना मिल मालकांनी मिलच्या जागेचे काल्पनिक दोन भाग करुन विकास नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन केले असतांनाही माहे जानेवारी, २०१७ मध्ये महापालिकेने दिलेली परवानगी, तसेच मोकळ्या जागेची अट शिथील करण्यास व्यावसायिक व मालक यांना केलेली मदत, सदर घटनेनंतर मुंबईतील सर्वच उपहारगृहांच्या केलेल्या तपासणीत अनेक उपहारगृह मालकांनी महापालिकेच्या नियमांचे केलेले उल्लंघन, माहे जानेवारी २०१७ ते जानेवारी २०१८ या कालावधीत मुंबई शहर व उपनगरातील ४७९० आगी लागण्याच्या घटनांची झालेली नोंद, तथापि, त्यावर उपाययोजना होत नसणे, मुंबई, ठाणे, पुणे या शहरात मोठ्या प्रमाणात हुक्का पार्लर, पब सुरु असून प्रत्येक व्यवसाय व उद्योगाला अग्निसुरक्षेचे प्रमाणपत्र घेणे व दर सहा महिन्यांनी अग्निसुरक्षेची तपासणी करणे अनिवार्य असतांना त्याकडे प्रशासनाचे झालेले दुर्लक्ष, या सर्व प्रकरणाची सीबीआय मार्फत चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द गुन्हा दाखल करणे, मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच वाढत्या आगीच्या घटनांना आळा घालण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. सुनिल प्रभु, विजय वडेट्टीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, सुनिल केदार, अमर काळे, हर्षवर्धन सपकाळ, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. डी.पी.सावंत, अस्लम शेख, डॉ.संतोष टारफे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

''राज्यातील इयत्ता दहावीचे बालभारतीचे संपूर्ण पुस्तक प्रकाशनापुर्वीच व्हॉट्सॲपवर व्हायरल झाल्याचे दि. २९ जानेवारी, २०१८ रोजी निदर्शनास येणे, यंदाच्या शैक्षणिक वर्षात दहावीचा अभ्यासक्रम बदलणार असल्याने बालभारती पुस्तक निर्मितीची जबाबदारी सोपविलेल्या राज्य शिक्षण मंडळाकडून छपाई होण्याअगोदरच विज्ञान तंत्रज्ञान भाग-१ आणि भाग-२ ची पुस्तके व्हॉट्सॲपवर व्हायरल झालेली असणे, बालभारती प्रशासनाने सुरक्षेबाबत योग्य ती खबरदारी न घेतल्यामुळे सदर घटना घडणे, यामुळे बालभारतीच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत निर्माण झालेला संशय, प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे छपाईच्या अगोदरच पुस्तक व्हायरल झाल्यामुळे या पुस्तकाच्या आधारे गाईडची निर्मिती करणा-या कंपन्यांना वेळेआधीच गाईड छापून बालभारती पुस्तकाबरोबरच विक्री करुन नफेखोरी करण्यास प्रशासनाने उपलब्ध करुन दिलेली संधी, सदरहू प्रकरणाची चौकशी करुन दोषी अधिकारी यांचे विरुध्द कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.''

**सहा : शासकीय विधेयके :**

**पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ – पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०१८.

**(२)** सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ – महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१८.

**(३)** सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ – महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१८.

**सात : डॉ. अनिल बोंडे, सर्वश्री सुनिल प्रभु, राजेंद्र पाटणी, सुरेश धानोरकर, संजय सावकारे, डॉ. संजय रायमुलकर, श्री संतोष दानवे, डॉ.शशिकांत खेडेकर, सर्वश्री सुधीर पारवे, सुभाष साबणे, विकास कुंभारे, डॉ. जयप्रकाश मुंदडा, सर्वश्री सुधाकर कोहळे, संदीपान**

**भुमरे, कृष्णा गजबे, राजाभाऊ वाजे, विजय रहांगडाले, अनिल कदम, चरण वाघमारे, योगेश घोलप, उन्मेश पाटील, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री. आर.टी.देशमुख, सुरेश गोरे, ॲड गौतम चाबुकस्वार, प्रा. संगिता ठोंबरे, सर्वश्री नारायण पाटील, सुधाकर भालेराव, प्रकाश आबिटकर, किर्तीकुमार भांगडिया, अनिल बाबर, रणधीर सावरकर, राजेश क्षीरसागर, गोवर्धन शर्मा, डॉ.मिलिंद माने, सर्वश्री मंगेश कुडाळकर, भिमराव धोंडे, समीर कुणावार, शिवाजीराव कर्डिले, बाळासाहेब मुरकुटे, डॉ.आशिष देशमुख, सर्वश्री बाळासाहेब सानप, संजय केळकर, डॉ. राहुल आहेर, वि.स.स यांचा म.वि.स. नियम** २९३ **अन्वये प्रस्ताव :-**

"राज्यात जालना, परभणी, बुलढाणा, बीडसह मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र व विदर्भातील अनेक तालुक्यांमध्ये दिनांक ११ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास गारपीटीचा प्रचंड तडाखा बसणे तसेच विदर्भातील काही भागात वीज कोसळून ७ जणांचा बळी गेल्याचे व १६ जण जखमी झाल्याचे निदर्शनास येणे, तूर, हरभरा, गहू, ज्वारी ही काढणीला आलेली पिके आकस्मिकरित्या गारांच्या तडाख्यात सापडल्याने भुईसपाट होणे, संत्रा आणि द्राक्ष बागांचे प्रचंड नुकसान झाल्याचे निदर्शनास येणे, या भागातील शेतकऱ्यांनी मेहनत करून उभी केलेली पिके मातीमोल होणे, विशेषत: विदर्भातील बोंडअळीमुळे कापूस पिक गमावलेल्या शेतकऱ्यांचा गारपीटीमुळे हातातोंडाशी आलेला पिकांचा घास गेला असल्याचे व शेतकऱ्यांची लाखो रुपयांची पीकहानी झाली असल्याचे आढळून येणे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या हानी झालेल्या पिकांचे पंचनामे करण्याचे आणि विमा कंपन्यांना आकडेवारी सादर करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले असणे, याबाबत शासनाने कार्यवाही करून गारपीटग्रस्तांना तातडीने नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**आठ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

(१) **श्री. मनोहर भोईर, वि.स.स.**

"**रायगड जिल्ह्यातील भोम आणि टाकीगाव दरम्यानच्या भागातील बांधबंदिस्ती फुटल्याने भात शेतीचे झालेले नुकसान**" या विषयावरील श्री. मनोहर भोईर, वि.स.स यांचा दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ३७५ मधील प्रश्न क्रमांक ७५५९८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(२) **श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स.**

"**मौजे राजुर (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील रस्त्याच्या रुंदीकरणासह पुलाचे नुतनीकरण करण्याबाबत**" या विषयावरील श्री. हर्षवर्धन सपकाळ व इतर

वि.स.स यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ९६०४९ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २६ फेब्रुवारी, २०१८

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.